जाहिरात

इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दिमत्ता आयुक्तालय, मुंबई

सेवानिवृत्त सहायक संचालक (लेखा) यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत.

इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दिमत्ता आयुक्तालयाच्या अधिनस्त राज्य सेतू सोसायटीच्या अर्थ/लेखाविषयक सर्व बाबींचे कामकाज, इ. या विवक्षित कामकाजासाठी, लेखाविषयक कामकाजाचा अनुभव असलेल्या, राज्य शासनाच्या लेखा व कोषागरे संचालनालयाच्या सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या **सहायक संचालक (लेखा) यांचे १ पद, १ वर्षाच्या कालावधीकरीता**, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दिमत्ता आयुक्तालय, मंत्रालय, मुंबई या कार्यालयात करार पध्दतीने भरावयाचे आहे.

सदर नियुक्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्र.सीबीई-१५२५/प्र.क्र.३७/आस्थामं (कार्या-१३), दि. १० जून, २०२५ च्या शासन निर्णयानुसार करण्यात येईल.

अधिक माहिती महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळ www.maharashtra.gov.in वर उपलब्ध आहे. इच्छूक उमेदवारांनी संकेतस्थळावरील माहिती पाहून अर्ज करावेत.

अर्ज करण्याचा कालावधी संकेतस्थळावर प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून ते ७ दिवसापर्यंत असा आहे.

Digitally signed by
BUVENESWARI SURIYAN
Date: 04-11-2026
12:32:44

( )

आयुक्त, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान
व कृत्रिम बुध्दिमत्ता आयुक्तालय.

इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दिमत्ता आयुक्तालय, मंत्रालय, मुंबई

सहायक संचालक (लेखा) या संवर्गातून सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत

आयुक्तालयाची आवश्यकता:

इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दिमत्ता आयुक्तालयाच्या अधिनस्त राज्य सेतू सोसायटीच्या अर्थ/लेखाविषयक सर्व बाबींचे कामकाज, इ. या विवक्षित कामकाजासाठी, लेखाविषयक कामकाजाचा अनुभव असलेल्या, राज्य शासनाच्या लेखा व कोषागरे संचालनालयाच्या सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या **सहायक संचालक (लेखा) यांचे १ पद, १ वर्षाच्या कालावधीकरीता**, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दिमत्ता आयुक्तालय, मंत्रालय, मुंबई या कार्यालयात करार पध्दतीने भरावयाचे आहे.

अटी व शर्ती :-

१) सदर नियुक्ती **केवळ एक वर्षाच्या कालावधीकरिता** सामान्य प्रशासन विभागाच्या क्र.सीबीई-१५२५/प्र.क्र.३७/आस्थामं (कार्या-१३), दि. १० जून, २०२५ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार करण्यात येणार आहे.

२) उमेदवार हा राज्य शासनाच्या लेखा व कोषागरे संचालनालयाच्या सेवेतून **सहायक संचालक (लेखा)** या पदावरुन सेवानिवृत्त झालेला असावा.

३) उमेदवारास अर्थ/लेखाविषयक कामकाजाचा किमान ४ वर्षांचा अनुभव असावा.

४) उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे चांगले ज्ञान असावे.

५) उमेदवाराचे वय ६२ वर्षापेक्षा अधिक नसावे.

६) उमेदवार मुंबई अथवा लगतच्या जिल्ह्यात राहणारा असावा.

७) आवश्यक अर्हता धारणा करणाऱ्या इच्छुक सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी सदर पदाकरिता विहित नमुन्यात अर्ज सादर करावा.

८) उमेदवाराने सदर पदाकरिता अर्ज सदर जाहिरात संकेतस्थळावर प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ७ दिवसांच्या आत "आयुक्त, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दिमत्ता आयुक्तालय, ७१९, विस्तार इमारत (मंत्रालय), ७ वा मजला, मुंबई-४०० ०३२" या पत्त्यावर पोहोचेल, अशा रितीने पोस्टाने पाठवावा अथवा व्यक्तीशः आणून द्यावा. विहित दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येणार नाही. तसेच या संदर्भातील कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही.

९) आयुक्तालयास आवश्यक असलेली अर्हता व अनुभव नसलेल्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी अर्ज सादर करु नये. अशा अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जासंदर्भात शासनाशी केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही.

१०) मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल. उमेदवार निवडीबाबतचा संपूर्ण अधिकार आयुक्तालयास राहतील.

११) करार पध्दतीने नियुक्त सेवानिवृत्त अधिकाऱ्यास इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दिमत्ता आयुक्तालय, मंत्रालय, मुंबई येथे काम करावे लागेल.

१२) इतर अटी व शर्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्र.सीबीई-१५२५/प्र.क्र.३७/आस्थामं (कार्या-१३), दि. १० जून, २०२५ च्या शासन निर्णयातील शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे राहतील तसेच या व्यतिरिक्त आयुक्तालय ठरवेल त्या अतिरिक्त अटी व शर्ती संबंधित उमेदवारावर बंधनकारक असतील.

****

अर्जाचा नमुना

सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याकरिता अर्ज

उमेदवाराने अलीकडील काळातील स्वतः चे छायाचित्र येथे चिकटवावे

१. अर्जदाराचे संपूर्ण नाव :-_____

२. अर्जदाराचा पत्ता :-_____

३. सेवानिवृत्तीच्या वेळचे पदनाम :-_____

४. भ्रमणध्वनी क्रमांक :-_____

५. जन्म दिनांक व वय :-_____

६. विभागास आवश्यक अर्हता अर्जदाराकडे आहे काय ? :- होय/नाही

७. अनुभव :-

अ.क्र.	यापूर्वी काम केलेल्या विभागाचे नाव	कालावधी	कामाचे स्वरुप/विषय

विशेष उल्लेखनीय काम:-

_____

_____

_____

इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दिमत्ता आयुक्तालयाच्या अधिपत्याखालील राज्य सेतू सोसायटीच्या अर्थ/लेखाविषयक सर्व बाबींचे कामकाज हे विवक्षित कामकाज हाताळण्याकरीता १ वर्षाच्या कालावधीकरीता सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची करार पध्दतीने

नियुक्तीबाबतची जाहिरात/सूचना मी काळजीपूर्वक वाचली असून सदर जाहिरातीतील/सूचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण :-

दिनांक :- अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी